"शिक्षक पात्रता परीक्षा"ची कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत सर्व प्राथमिक शिक्षकांकरिता ( इ.१ ली ते ८ वी सर्व व्यवस्थापन, सर्व मंडळे, सर्व माध्यमे, अनुदानित /विनाअनुदानित /कायम विनाअनुदानित इत्यादी शाळांसाठी ) शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य.

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन शुध्दीपत्र क्र.- टिईटी- २०१४/प्र.क्र.२९४/टीएनटी-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : ३ डिसेंबर, २०१४

वाचा-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक आरटीई-२०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१, दिनांक - २३ ऑगस्ट,२०१३.

२. शासन शुध्दीपत्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.- आरटीई-२०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१, दिनांक ९ सप्टेंबर, २०१४.

### शासन शुध्दीपत्र

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक आरटीई-२०१३ /प्र .क्र.९१ /प्राशि-१, दिनांक २३ ऑगस्ट,२०१३ मधील अ.क्र.(४) मधील "शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मध्ये कनिष्ठ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) व वरिष्ठ प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) या दोन गटातील शिक्षकांसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र प्रश्नपत्रिका राहतील. दोन्ही गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास दोन्ही प्रश्नपत्रिका सोडविणे आवश्यक राहील"

या ऐवजी

"शिक्षक पात्रता परीक्षा (TET) मध्ये कनिष्ठ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ५ वी) व वरिष्ठ प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) या दोन गटातील शिक्षकांसाठी प्रत्येकी एक स्वतंत्र प्रश्नपत्रिका राहील. इ. ६वी ते ८ वी या गटासाठीची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास इयत्ता १ ली ते ५ वी गटासाठीची परीक्षा उतीर्ण होणे आवश्यक राहणार नाही तसेच कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण व संगीत या विषयांच्या पदविका व पदवीधारक शिक्षकांना TET परीक्षा उतीर्ण होणे अनिवार्य राहणार नाही." असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१२०३१२४४१५०९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

(रा.ग. गुंजाळ)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ( सर्व )
४. मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्य विधान भवन, मुंबई (सर्व)
५. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
६. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०. जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई
१३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१४. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. शिक्षण संचालक (निरंतर शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
१७. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे
१९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
२०. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२१. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद (सर्व)
२२. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगर परिषद (सर्व)
२३. निवड नस्ती, (टिएनटी -१)